# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. सआजीउ/ 34760 /अनु.(अ.नि.) दि. 16.10.2017

## जाहिर सूचना

विषय :- जी/उत्तर विभागाकरीता अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्याकरीता कंत्राटी कामगार अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) मार्फत पुरवठा करण्यासंबंधी जाहिर सुचना.........

सदर सुचनेद्वारे नोंदणीकृत सर्व अशासकीय संस्थाना (एन.जी.ओ.) कळविण्यात येते की, जी/उत्तर विभागातील अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्याकरीता खालील अटींनुसार कंत्राटी कामगार भाडे तत्वावर घेण्याबाबत इच्छुक अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) सहाय्यक आयुक्त जी/उत्तर विभाग, कार्यालय इमारत, हरिश्चद्र येलवे मार्ग, दादर, मुंबई 400028 यांचे नावे नोंदणी प्रमाणपत्रे व अनुभव इत्यादी आवश्यक कागदपत्रांसहीत दिनांक 07.11.2017 रोजी दुपारी 01.00 वाजेपर्यंत अर्ज अनुज्ञापन खाते, जी/उत्तर विभाग, खोली क्र. 7, तळ मजला, हरिश्चद्र येलवे मार्ग, दादर, मुंबई 400028 येथे सिलबंद पेटीत टाकावे.

अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांनी अर्जासोबत खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

1. सदर कामासाठी फक्त स्थानिक जी/उत्तर विभागातील संस्थांनी अर्ज करावेत.
2. कार्यादेशाच्या दिनांकापासून दि. 31/03/2018 या कालावधीकरीता आवश्यकतेनुसार कामगार पुरविणे.
3. रु. 560.76 प्रति कामगार प्रतिदिन + 46% लेव्हीचे (रु. 258/-) अधिदान परिपत्रक क्र. प्रकाअ / 64 दि. 30.04.2011 मधील अटीच्या पूर्ततेनंतर (प्रतिपूर्ती स्वरुपात) देण्यात येईल.
4. जी/उत्तर विभागातील अधिका-यांच्या सुचनेनुसार रोजच्या कामाकरीता मागणी केलेल्या (दिवस /दुपार / रात्र ) सुरळीतपणे, विनाविलंब, सक्षम कामगारांचा पुरवठा करणे.
5. पुरवठा केलेल्या कामगारांच्या बिलाची रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिका नियमांनुसार आवश्यक पडताळणी व लेखा परिक्षणानंतर विभागीय लेखा सांकेतांक 220800400 या लेखाशिर्षातून संबंधित संस्थेला ई.सी.एस./ एन.ई.एफ.टी. द्वारे पुढील महिन्याच्या 15 तारखेनंतर अधिदान केले जाईल.
6. बाल कामगारांना पुरवठा करणे निषिद्ध आहे व तसे केल्यास त्याची संपुर्णत: कायदेशीर जबाबदारी संबंधित अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांचीच राहिल.
7. अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांनी नोंदवणी प्रमाणपत्र, बँक खात्याचा तपशिल, मागील वर्षाचा ताळेबंद अहवाल व कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
8. वरील अटींचे पालन न करणा-या व समाधानकारकरित्या काम न करणा-या अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांचेकडून कामगार पुरवठा करण्याचे काम त्वरीत थांबविण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त जी/उत्तर विभाग यांना राहतील.
9. अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांचेकडून विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन लॉटरी पद्धतीने पात्र अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांची निवड करण्यात येईल.

वरील निकषामध्ये न बसणा-या संस्थांना कोणतेही कारण न देता अपात्र ठरविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

लॉटरीची तारीख दि.08.11.2017 रोजी दुपारी 3.00 वाजता निश्चित करण्यात आलेली आहे.

सही/- १६.१०.२०१७

**सहाय्यक आयुक्त जी/उत्तर विभाग**